# शाळेतल्या आंबट गोड आठवणी

■ डॉ. जयंत नारळीकर

बिगरी ते मॅट्रिक मी बनारस हिंदू युनिव्हर्सिटीच्या आवारातल्या शाळेत गेलो. त्या 'युनिव्हर्सिटी चिल्ड्रेन्स स्कूल'चे आता केंद्रीय विद्यालय झाले आहे. पण १९४३-५३ च्या दशकात ती शाळा लहानच होती. मी प्रवेश केला तेव्हा चौथीपर्यंतच होती पण मी तिसरीत गेलो तेव्हा पाचवीचा वर्ग नव्याने आला. आणि असेच दरवर्षी एक एक वर्गाने वाढत शाळा दहावी म्हणजे मॅट्रिकला जाऊन भिडली तेव्हा मी आठवीत गेलो होतो.

'इंफट्स क्लास'मधून दोन तीन महिन्यांतच मला पहिलीत 'डबल प्रमोशन' मिळाले. पण पहिलीचा अभ्यास अवघड वाटला असावा ... किंवा मी लक्ष देऊन केला नसावा. एवढे मात्र आठवतेय की माझे वडील आणि मी मे महिन्यातल्या एका सकाळी रणरणत्या उन्हातून सायकलरिक्षाने शाळेत गेलो, रिझल्ट आणायला. परत येताना वडिलांनी निकाल वाचून दाखविला. माझा आठवा नंबर आला हे सांगताना त्यांचा आवाज थंड होता! पण बरोबर एका वर्षाने पुन्हा हाच कार्यक्रम झाला तेव्हा त्यांनी उत्साहाने सांगितले, "तू पहिला आलास."

तिसरीत आजारपणामुळे पहिला नंबर हुकला. पण चौथीपासून कायम झाला. आणि 'मॉनिटर', 'प्रिफेक्ट'सारखी बिरूदे चिटकू लागली. पण एका प्रसंगाने जाणीव करून दिली की, ह्या अधिकारांबरोबर जबाबदारी पण वाढते.

मला वाटते सहावीतली गोष्ट असेल.

शेवटचा ड्रिलचा तास होता. आम्ही मास्तरांची वाट बघत होतो. ते पाच मिनिटे झाली तरी आले नाहीत. तेव्हा एक मुलगा चौकशी करायला गेला. आणि उलट पावली परत आला आनंदी चेहेऱ्याने. "मास्तर आज आलेच नाहीत.... तेव्हा हा तास होणार नाही." वाक्याचा उत्तरार्ध म्हणजे त्याचे स्वतःचे मत होते. हे विचारात न घेता सर्व मुले दप्तरे घेऊन घराकडे पळाली. मी पण घरचा मार्ग धरला. अनपेक्षितपणे शाळा लवकर सुटल्याचा आनंद सर्वांनाच होता.

पण दुसऱ्या दिवशी त्या आनंदावर विरजण पडले. हेडमास्तरांनी मला



बोलाविले. आणि लवकर का गेलास म्हणून जाब विचारला. “ सर, ड्रिलचे मास्तर आले नाहीत व शेवटचा तास होणार नव्हता म्हणून आम्ही सगळेच गेलो.”

“पण तू प्रिफेक्ट आहेस ! क्लास सोडताना वर्गशिक्षक किंवा मला विचारायला हवे होतेस. तुझ्यापासून ही अपेक्षा नव्हती.” त्यांनी सौम्य पण स्पष्ट शब्दात बजावले.

मी आठवीत असताना गणिताचे शिक्षक आले नाहीत म्हणून हेडमास्तरांनी एक दिवस प्रायमरी क्लासेसना गणित शिकवणारे शिक्षक वर्गात पाठविले.



त्यांना आम्ही 'भाखामास्टर' म्हणून ओळखायचो. ते खेड्यातले असून त्यांचे बोलणे चालणे अगदी 'गावठी' होते म्हणून आम्ही मुले आडून त्यांची टर उडवायचो. पण आम्हाला त्यांनी शिकवायला यावे असे पूर्वी कधी घडले नव्हते. कारण आम्ही होतो 'सेकंडरी'तले. त्या दिवशीसुद्धा हे प्रायमरी सर आम्हाला काय शिकवणार असा एक हेटाळणीवजा विचार मनात आला.

पण भाखा मास्टरनी आम्हाला त्या दिवशी पूर्ण चित केले. " चला तुम्हाला गणिते घालतो. " ते म्हणाले. " सर अल्जिब्रा का जॉमेट्री ? " एका ज्यादा मुलाने विचारले. " साधे सोपे अंकगणित - ॲरिथमेटिकल ... बघू या कशी सोडवता ते. "

मला वाटते त्यांनी तीन गणिते दिली आणि आम्हाला कोणालाच ती सोडवता आली नाहीत. मी जरा शेखीने ती अल्जिब्रा वापरून सोडवायला गेलो ते समीकरणात रुतून बसलो. शेवटी वर्ग संपताच भाखा मास्टरांनी उत्तरे सांगितली. केवळ अंकगणितातल्या खुब्या वापरून त्यांनी ती चुटकीसारखी सोडविली.... आणि आम्हा 'सेकंडरीवाल्यांचा' नक्षा पार उतरविला.

दहावीतली सहामाही परीक्षा म्हणजे मॅट्रिकची रंगीत तालीमच. माझी हिंदीची उत्तरपत्रिका खुद्द हेडमास्तरांनी तपासली होती. मला शंभरपैकी पासष्ट मार्क मिळाले होते व ते वर्गात सर्वांत जास्त होते. पण माझ्या समाधानावर पाणी सोडत हेडमास्तर म्हणाले, " जयंत, अशा तयारीवर तुला मॅट्रिकमध्ये डिस्टिंक्शन (१०० पैकी ७५) मिळणार नाही. "

मला आश्चर्य आणि वाईट दोन्ही वाटले. हिंदी हा विषय असा की, ज्यात मार्क द्यायला परीक्षक कंजुषी करतात ही ख्याती. " सर ! हिंदीत डिस्टिंक्शन कसे मिळेल? मार्क फार कापतात तिथे. " मी उत्तरलो. "अवघड आहे पण अशक्य नाही. तू अधिक प्रयत्न करावास इतकी तुझी तयारी आहे. " असे म्हणून त्यांनी काही सुधारणा आणि तयारी कशी करावी



ते सांगितले.

मॅट्रिकचा निकाल जाहीर झाला. तो सांगायला माझे वसंतमामाच आले. "पहिल्या नंबराबद्दल अभिनंदन" ... ते काय म्हणताहेत ते डोक्यात घुसायला वेळ लागला ! पण आमच्या शाळेतला पहिला विद्यार्थी मॅट्रिक सर करणारा. याचा मला आनंद झालाच पण त्यात विशेष भर पडली तेव्हा मामांनी मला डिस्टिंक्शन मिळालेल्या विषयात उल्लेख केला हिंदीचा.

